शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७
ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com

---

जा.क्र. उमाशि-१/तक्रार कार्यवाही /शिउसं/पुवि/२०१५ दिनांक : 20 JAN 2016

प्रति,

प्राचार्य
सर्व कनिष्ठ महाविद्यालय

विषय :- अभिवेदने (तक्रार अर्ज) सादर करणेबाबतची कार्यवाही..........
संदर्भ :- महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९८१

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे तक्रार अर्ज परस्पर या कार्यालयाकडे येतात. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९८१ मधील कलम २४ नुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांनी त्यांची नोकरी किंवा त्यांची शाळा या संबंधात व्यवस्थापक वर्गाकडे किंवा विभागाकडे केले जाणार अभिवेदने (तक्रार अर्ज) मुख्याध्यापक /प्राचार्य यांचेमार्फत या कार्यालयाकडे सादर करणे आवयक आहे. तरी सदर प्रकरणी आपण आपल्या स्तरावरुन संबंधित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यास याबाबत लेखी कळवावे व त्याची एक प्रत या कार्यालयाकडे सादर करावी.

शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचे बरेचसे अर्ज हे त्यांची नोकरी किंवा त्या अनुषंगिक बाबीशी निगडित असतात. अशावेळी सदर अभिवेदने (तक्रार अर्ज) हे प्राचार्य यांचेमार्फतच विभागाकडे पाठविण्यात येतील. तथापि तक्रारदाराची इच्छा असल्यास त्याच्या तक्रार अर्जाची एक आगाऊ प्रत विभागाकडे पाठवू शकेल परंतु सदर तक्रार अर्जास आपल्या कडून संबंधितांना पोहोच देण्यात यावी.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९८१ मधील कलम २४ नुसार अभिवेदने (तक्रार अर्ज) या कार्यालयास शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांनी परस्पर सादर केल्यास त्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सदर बाब आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निर्दशनास आणावी.**

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर
१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे